# विश्वकर्मा विद्यापीठात २३० जणांचे रक्तदान

पुणे, ता. ३ : राष्ट्रीय रक्तदान सप्ताहाच्या निमित्ताने विश्वकर्मा विद्यापीठ व पिंपरी चिंचवड रक्तपेढी यांच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात २३० विद्यार्थी व विद्यापीठ कर्मचाऱ्यांनी रक्तदान केले. रक्तदात्यांना हेल्मेट भेट दिले. विश्वकर्मा विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक प्रा. वैभव ठाकरे यांनी रक्तदानाचे महत्त्व सांगितले.